# आपत्‌काली सेवा देणारे श्वानपथक

**मो**ठ्या हौसेने विकत आणलेल्या जातिवंत श्वानाचे पिलू सहा महिन्यांचे झाले तरी भुंकत नाही, जगन्मित्रासारखे आल्या गेल्याचे स्वागत करते, त्यावेळी त्या कुत्र्याच्या मालकाने काय करावे असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर त्यावर उत्तर आहे, त्या पिलाचा राष्ट्रसेवेसाठी उपयोग होऊ शकतो. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, या म्हणीप्रमाणे श्वान पिले वयाच्या तीन महिन्यांपासून सहा महिन्यापर्यंत त्यांचा मूळ स्वभाव दाखवू लागतात. त्यांच्या मूळ स्वभावात जन्मभरात फरक पडू शकत नाही. श्वानाची पैदास करताना कितीही काळजीपूर्वक निवड केली तरी स्थान व काळ यांच्या परिणामामुळे किमान २५ टक्के श्वान पूर्वजांपेक्षा म्हणजे वंशावळीतील पाच सात पिढ्यांतील श्वानांपेक्षा वेगळेच निपजतात हे कालातीत सत्य आहे.

सध्या श्वानपैदास हा अतिसामान्य माणसांच्या हातातील व्यवसाय झाला आहे. थोड्या भांडवलावर थोड्या जागेत करता येणारा हा धंदा झालेला आहे. जे नवशे या प्रांतात वावरतात, त्यांचे लक्ष श्वान प्रदर्शनात बक्षीसपात्र श्वान तयार करण्याकडे लागलेले असते. श्वान प्रदर्शनात बक्षिसासाठी निवड करण्यात आलेले सर्वोत्तम श्वान हे त्या जातीच्या वर्णनाबरहुकूम ९५ टक्के च्या आसपास आढळतात. श्वान जातीच्या वर्णनात त्यांच्या रूपाएवढेच त्यांच्या गुणांना महत्व असते. श्वान जातीचे जे वर्गीकरण केले आहे ते पाहिले की हे आपल्या लक्षात येईल. श्वान जातीचे सुख्य तीन वर्ग पडतात. १. शिकारी श्वान २. धनगरी श्वान ३. भूवर्ती श्वान

शिकारी श्वानांना त्यांचे भक्ष किंवा शत्रू समोर दिले की त्याचा पाठलाग करून त्यांना ठार मारल्याशिवाय चैनच पडत नाही. हे करताना ते बेभान होतात. स्वतःच्या जिवाची देखील त्यांना पर्वा नसते. शानांच्या पळण्याच्या शर्यतीत यातीलच श्वान निवडतात, जसे ग्रेहाउंड.

धनगरी श्वान याच्या बरोबर उलट स्वभावाचे असतात. ज्यांचा सांभाळ करायचा असतो त्यांच्यासाठी ते स्वतःच्या जिवाचीही पर्वा करणार नाहीत. पण शत्रूला गारद करण्याकडे त्यांची प्रवृत्ती नसते. आपल्यापासून शत्रूला दूर ठेवणे हा त्यांचा स्वभाव असतो. दूर रहा हे सांगण्यासाठी ते नजरेचा वापर करतात. त्यांच्या नजरेला नजर देणे भल्याभल्यांना शक्य होत नाही. नजरेच्या जरबेने भागले नाही, तर धनगरी श्वान घशातून गुरगुरण्याचा आवाज काढतात किंवा भुंकतात. एवढे करून शत्रू दूर जात नसेल तर मात्र त्याच्यावर हल्ला करतात. पण ते हल्ला करतात, तो शत्रूला पळवून लावण्यासाठी, त्याला ठार मारण्यासाठी नव्हे. जगप्रसिध्द जर्मन शेफर्ड किंवा अल्सेशियन तसेच गोल्डन रिट्रीव्हर या जाती या प्रकारच्या धनगरी जातींचा नमुना म्हणून दाखविता येतील. महाराष्ट्रात सह्याद्रीच्या रांगांमध्ये काळ्या रंगाचे, अंगावर लांब केस असलेले वंजारी धनगरी किंवा बलुची नावाने ओळखले जाणारे शान आहेत. ते खूप तापमानात देखील उत्तम काम करू शकतात पण या स्थानिक जातीला अजून अधिकृत मान्यता मिळालेली नाही.

टेरियर किंवा भूवर्ती श्वान हे शेतकऱ्यांच्या उपयोगाचे असतात. उंदीर, घुशी हे त्यांचे शत्रू. बिळात राहणाऱ्या प्राण्यांचा त्यांना सुगावा लागला की त्यांना ठार मारल्याशिवाय या जातीच्या श्वानांचा जीवच शांत होत नाही. फॉक्स टेरियर, तिबेटियन टेरियर या अशा श्वान जाती.

जागतिक महायुद्धानंतर माणसांना आलेले एकाकीपण घालविण्यासाठी माणसांना सोबत करणारे किंवा माणसांच्या विरोधात काम करण्यासाठी डॉबरमन व कॉन्सर तसेच माणसांसाठी काम करण्यासाठी लॅबराडोर व बॉक्सर, अल्सेशियन, डॉबरमन किंवा गोल्डन रिट्रीव्हर या जातींतील श्वान निवडले जातात. आपद्ग्रस्त परिस्थितीत जसे ढिगाऱ्याखाली गाडले गेलेल्यांची सुटका करण्यासाठी तसेच पुराने वेढलेल्या जागी अडकलेल्या माणसांना ताबडतोब रसद पुरविण्यासाठी श्वानांचा उपयोग होतो. लॅबराडोर हे मूळ कोळ्यांचे श्वान. लॅबराडोर बंदरातील मासेमारी करणारे कोळी हे श्वान बोटीवर त्यांच्या बरोबर घेऊन जातात. कारण या श्वानांना पाण्यात पोहण्याची प्रचंड ताकद असते. प्रवाहाच्या विरुद्ध देखील ते पोहू शकतात. दुसरे म्हणजे माणूस प्राण्याबद्दल त्याच्या मनात खूप प्रेम व आदर असतो.

राज्य पोलीस दलात लॅबराडोरचा समावेश झाला तो त्याच्या तीक्ष्ण नाकामुळे. एक लॅबराडोर नुसत्या वासाने हा प्राणी कोण, माणूस की माकड हे ओळखू शकतो. तसेच पदार्थ देखील तो ओळखतो. बॉंबसाठी वापरले जाणारे धातू व रसायने तो त्यांच्या वासाने लक्षात ठेवतो व आसमंतातून शोधून काढतो. सर्वसाधारण हौशी श्वानपालक श्वान जातीची पैदास व त्यांची वैशिष्ट्ये लक्षात न घेता श्वान पिलू घेतात. साधारणतः ही निवड करताना पोलीस वापरत असलेले श्वान, टीव्हीच्या जाहिरातीत वापरले जाणारे श्वान, प्रसिध्दी पावलेले श्वान असे त्यांचे निवडीतील निकष असतात. पण श्वानाची निवड करताना श्वानाच्या जातीपेक्षा त्या पिलाचा स्वभाव लक्षात घेणे आवश्यक असते. भारतात पाच ते सहा आठवड्याची पिले विक्रीस आणली जातात. खरे म्हणजे श्वान पिले चार -पाच महिन्यांनंतर त्यांचा स्वभाव दाखवू लागतात. पाचव्या सहाव्या महिन्यात तो पक्का होतो, तो वाळलेल्या माठासारखा असतो, तर एक वर्षाचा श्वान भाजलेल्या माठासारखा झालेला असतो. त्यामुळे आपद्ग्रस्त श्वान सेवा पथकात श्वान घेताना ते साधारणतः सहा ते आठ महिने वयाचे झाल्यावर निवडले जातात. दोन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर त्यांना कामावर रुजू केले जाते.

या कामासाठी निवडलेला श्वान त्याच्या आयुष्याच्या एक ते सहा-आठ महिने सुजाण नागरिकांच्या घरात वाढणे आवश्यक असते त्याचे कारण खूपच मनोरंजक आहे. आपद्ग्रस्त परिस्थितीत श्वानांनी प्रसंगी स्वतः निर्णय घेऊन काम करायचे असते. श्वान पथकात काम करणाऱ्या सैनिक-शिपाई पातळीच्या लोकांना श्वानाचे मानसशास्त्र समजणे कठीण असते. त्याच्याही पुढे जाऊन श्वानांची भाषा शिकायची त्यांची मनःस्थिती नसते. आपल्या श्वानाच्या काही शक्ती आपल्यापेक्षा अधिक आहेत व त्या श्वानाला वापरू द्याव्या हे अनेक हॅंडलर्सना (कुत्तेवानांना) समजत नाही. श्वानांच्या सर्व शक्तींत ऐकण्याची शक्ती ही माणसाच्या शक्तीपेक्षा ४० ते ४५ पट अधिक असते. माणसांना जे आवाज ऐकू येत नाहीत, ते आवाज श्वानांना बरोबर कळतात. त्याचे एक उत्तम उदाहरण एका इंग्रजी लेखकाने दिले आहे. माय आइज हॅव कोल्ड नोज (थंड नाक असलेले माझे डोळे) हे त्या पुस्तकाचे नाव. लंडनच्या ट्रॅममधून ही अंध व्यक्ती प्रवास करीत असे. त्याचा श्वानही त्यावेळी त्याच्या पायाशी बसत असे. हा श्वान नेमका त्याचे उतरण्याचे स्थानक आले की उठून उभा राही. ते ठिकाण नेमके कसे त्या श्वानास कळते याचे त्या ट्रॅममधून जाणाऱ्या डोळस सहप्रवाशांना कुतूहल होते.

त्या श्वानाला फसवण्याचा त्या डोळस सहप्रवाशांनी घाट घातला. त्या विशिष्ट स्थानकाच्या आधी उतरणारे प्रवासी एक स्थानक आधीच उतरले. परंतु त्याचा काहीही परिणाम श्वानावर झाला नाही. त्याचे स्थानक येईपर्यंत तो श्वान मख्खासारखा डोळे मिटून शांत पडून राहिला. त्या श्वानाला चकविण्यासाठी सहप्रवाशांनी त्या आंधळ्याला आला माझा थांबा, चलतो आता असेही म्हटले. स्वतःच्या विचारात गर्क असलेल्या आंधळ्याला काहीच समजेना. श्वान उठला नाही म्हणजे आपला थांबा आला नाही हा त्याचा नेहमीचा अंदाज आज का चुकला हे त्याला कळेना. श्वान फसत नाही हे

लक्षात आल्यावर सहप्रवाशांनी त्या अंध प्रवाशाला विचारले असता तो आंधळा हसला व म्हणाला की तुम्हा डोळसांना ते कधी समजणार नाही, कारण तुम्ही तुमचे कान वापरीत नाही. आपला थांबा येण्याआधी ट्रामचे सांधे बदलले जातात. प्रत्येक रुळाचा व चाकांचा बदलण्याचा आवाज वेगवेगळा असतो. आम्हा अंधांना तो ऐकू येतो. पण त्याहीपेक्षा आमचे श्वान ते आवाज ओळखतात.

आपल्यापैकी ज्यांच्याकडे श्वान आहे त्यांच्या घरच्यांना तुमचे वाहन कोपऱ्यावर वळले की तुम्ही आला आहात हे श्वानाकडे बघून नेमके सांगता येते. एकाच मेकच्या अनेक गाड्या असल्या तरी ट्यूनिंग बदलले तरी प्रत्येक गाडीचा स्वतःचा असा एक आवाज असतो. हा आवाज आपले श्वान नेमके ऐकू शकते. त्यामुळे त्याच मेकच्या, तसाच आवाज असलेल्या अनेक गाड्यांतून नेमकी आपल्या धन्याची गाडी आलेली त्यांना समजते.

वाहनाचे एक ठीक आहे, पण एका लढाऊ पायलटने त्याचा अनुभव लिहिला आहे. तो म्हणतो की परतणाऱ्या विमानांचे आवाज ऐकून त्यात आपल्या मालकाचे विमान आहे की नाही हे त्या श्वानाला नेमके कळत असे व तो श्वान मालकाच्या स्वागतासाठी रनवेच्या बाजूला हजर राहात असे. ऐकण्याची ही शक्ती श्वान कशी वापरतो हे समजणे अवघड आहे. आपण जो विचार मनातल्या मनात करतो तो श्वानांना ऐकू येतो का असा प्रश्न मला अनेकदा पडतो. श्वानांना कवायत शिकविताना आपल्या मनातले विचार वाचून, ऐकून श्वानाने हाताळणाऱ्या बरोबर चालावे हे त्याला शिकविले जाते हे सर्वांनाच माहीत आहे. त्या कवायतीला दिलवर्क असे नाव आहे. हँडलर कसाही वळला तरी श्वानाने सावलीसारखे त्याच्याबरोर राहावे हा त्या कवायतीचा महत्वाचा भाग. श्वान व हँडलर यांच्या वळण्यात, थांबण्यात क्षणाचेही अंतर नसते हे सर्वांनी पाहावे.

सैन्यदल व पालीस दलातही श्वान शिक्षणाचा पहिला धडा हा बरोबर चालणे , दिलवर्क हाच असतो. त्यातून श्वान एकच शिकतो. हँडलरचे विचार ऐकणे. आणि म्हणूनच त्याच्या दोन महिन्यांपासून प्रशिक्षित श्वान शिक्षकाच्या हाताखाली वाढलेल्या श्वानांपेक्षा सुजाण घरात वाढलेले श्वान हे जास्त प्रसंगावधानी असतात. कारण सांगकामेपणापेक्षाही व्यक्तीने अक्कलहुशारीने निर्णय घेऊन वागणे घरातल्या श्वानाकडून अपेक्षित असते. घरात वाढलेल्य श्वानांना मालक नसतानाही काम करण्याची सवय असते. प्रशिक्षित श्वान हे हुकमाचे ताबेदार. सांगितल्यावर काम करणारे- सांगकामे असतात- नाही, त्यांना तसे केले जाते. खरे म्हणजे ही हाताळणाऱ्यांची चूक आहे. पण सैनिक-शिपाई पातळीवर काम करणाऱ्या अनेकांना हे समजत नाही. तीन एक महिन्यांची श्वान पिले अशा प्रकारे हाताळल्यावर हँडलरवर अवलंबून राहू लागतात. असे होऊ नये कारण वेळप्रसंगी मालकाचा हुकूम धुडकावून लावून योग्य तो निर्णय घ्यावा लागतो. असे आंधळ्यांचे श्वान व आपद्ग्रस्त पथकांचे श्वान शिकवायला ते सहा वा आठ महिन्यांचे झाल्यावर सुरुवात करावी लागते. पाश्चात्य देशांत जेथे अंधांना श्वान दिले जातात, अशा ठिकाणी सुजाण कुटुंबे देशसेवा म्हणून श्वान पिले सांभाळण्याचे काम करतात. त्याचप्रमाणे भारतातही आता आपाद्ग्रस्त परिस्थितीत मदत करणारे श्वानपथक तयार करताना त्याला लागणारी श्वानपिले वाढविण्यासाठी सुजाण बुद्धीच्या कुटुंबांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे.

ऐकण्यासारखीच श्वानांची दुसरी शक्ती, जी आपल्या उपयोग पडते ती म्हणजे वास घेण्याची. आपद्ग्रस्तांच्या सेवेसाठी श्वानांची वास घेण्याची शक्ती सर्वात जास्त उपयोगी पडते. श्वानांची सर्व आठवण शक्ती ही वासावरच अवलंबून असते. आपण जसे डोळ्यांनी पाहून समोरचा प्राणी श्वान आहे की मांजर आहे हे सांगू शकतो, तसे श्वान वासाने हे सांगू

शकतात. एवढेच नाही, तर माणसातल्या वेगवेगळ्या बाबी आपण जशा नजरेने ओळखतो तसे श्वान वासाने ओळखतात. वासाने व्यक्ती ओळखण्यापलीकडे जाऊन त्या व्यक्तीच्या मनात काय चालले आहे ते, म्हणजे त्या व्यक्तीच्या मनातील विचारही श्वान वासाने ओळखू शकतात. हे विधान आपल्याला थोडे विचित्र वाटेल, पण ते शक्य आहे. प्रसिध्द चित्रकार कै. सालकर यांनी मला सांगितले की बहुतेक सर्व प्राण्यांचे स्नायू सारखेच असतात. माणूस देखील एक प्राणीच, म्हणून चेहरे बदलले तरी स्नायू वापरण्याचे तंत्र सारखेच असल्याने राग आलेला हत्ती, वाघ वा श्वान यांचे चित्र माणसाला समजेल असे काढणे शक्य होते. प्राण्यांच्या चेहरेपट्टीत होणारे बदल त्यांच्या मनाची स्थिती दाखवितात. हे बदल त्यांच्या मेंदूकडून येणाऱ्या संदेशामुळे होत असतात. हे संदेश अवयवांकडे रसायनांमार्फत पाठविले जातात. या रसायनांचे प्रमाण कमी जास्त झाले की स्नायूच्या हालचालीत कमी जास्त फरक पडतो.

प्राण्यांच्या स्नायूंत बदल करविणाऱ्या रसायनांचा वास श्वानांना येतो. म्हणूनच श्वान माणसांच्या मनातले हेतू व नवरस भाव त्यांच्याकडे न पाहताही ओळखू शकतो. डोळ्यात फूल पडून आंधळे झालेल्या म्हाताऱ्या श्वानांना किंवा ठार बहिरे झालेल्या श्वानांनाही माणसाच्या मनातले भाव कळतात ते माणसाच्या शरीरात स्त्रवणाऱ्या रसायनांच्या वासाने. या वासांचे नेमके पृथक्करण करता यावे म्हणून श्वान पिलांना एक तर दुसऱ्या श्वानाबरोबर वाढवायला हवे. किंवा सर्वात उत्तम म्हणजे त्यांचे बालपण सुबुद्ध माणसांच्या कुटुंबात जायला हवे. ज्या कुटुंबात मुले, तरुण, वयस्कर अशी सर्व वयाची माणसे असतात, अशी घरे श्वान वाढवण्यासाठी उत्तम. अंगणात गुरेढोरे असतील तर फारच चांगले. घाबरणे, आनंद होणे, राग येणे, द्वेष करणे, मदतीची अपेक्षा करणे या सर्व भावभावनांमुळे तयार होणारी रसायने व त्यांचे वास श्वानांच्या माहितीचे असणे हे कुटुंबात राहिल्याने उत्तम साधते. या कारणाकरिता देखील श्वान पिलू सैन्यातल्यापेक्षा घरात वाढवले जाणे आवश्यक ठरते.

श्वानांच्या या वासाच्या शक्ती आपल्याला मृत्यूची चाहूल देऊ शकतात. श्वानांचे रडणे अपशकुनी असते हे सर्वचजण मानतात. मी आता त्यामागील शास्त्रीय सत्य उलगडून दाखवितो आहे इतकेच. आयुर्वेदात जी मृत्यूची लक्षणे सांगितली आहेत ती ज्या त्या मरणाऱ्या व्यक्तीमध्ये दिसतात एवढेच नाही, तर त्या व्यक्तीशी मनोभावे जोडलेल्या व्यक्तीमध्येही आढळतात. तनमनाने जोडल्या गेलेल्या व्यक्तीमध्ये त्यांना जोडणारा एक अदृष्य दुवा असतो. या दुव्याच्या माध्यमातून विचार त्यांच्यामध्ये पसरत असतात. विचारांची व्यक्त होण्याची ताकत हा विषय नीट समजावून घेऊ या. एखादी इमारत जेव्हा उभी राहते तेव्हा तिच्या विषयीच्या कल्पना जो माणूस त्या इमारतीसाठी पैसे गुंतवणार असतो त्याच्या मनात पहिल्यांदा येते. ती व्यक्ती तो विचार आर्किटेक्टशी बोलून दाखविते. मग आर्किटेक्टच्या मनात ती इमारत साकारते. तो आर्किटेक्ट त्या इमारतीचे कल्पनाचित्र काढतो. त्यानंतर इंजीनियर, सुतार,गवंडी इ. कारागीर मंडळी त्या इमारतीला प्रत्यक्ष आकार देतात. इमारतीचे मूळ स्वरूप व प्रत्यक्षात आलेले रूप यांच्यात तंतोतंत साम्य असतेच असे नाही, तर अनेकांचे विचार या इमारतीच्या संबंधात काम करतात व ते संलग्न होत जातात. प्रत्येक जिवाची विचाराची पातळी वेगवेगळी असते. आज या व्यक्त होणाऱ्या शक्तीला पदार्थविज्ञानाच्या भाषेत लहरींची लांबी, उंची या प्रमाणांत मोजले जाते. प्रत्येक प्राण्याची ग्रहणशक्तीची सीमाही त्यामुळे ठरते. आपण रेडिओ किंवा टीव्ही आपल्याला हव्या त्या बँडला किंवा लहरींना ट्यून करू शकतो. म्हणून आपल्याला हव्या त्या स्टेशनचे प्रक्षेपण मिळविता येते. त्या स्टेशनच्या लहरी घेऊ शकणारे यंत्र आपल्याकडे नसेल तर त्या ठिकाणी त्या लहरी असूनही आपल्याला त्या स्टेशनचा तो कार्यक्रम मिळू शकत नाही. त्याप्रमाणेच ही शक्ती श्वानात आहे, पण आपल्यात नाही. त्यामुळे मृत्यूची सूचना आपल्याला मिळणे अवघड जाते.

श्वानाचे शरीर आपल्यापेक्षा बरेच वेगळे असते. आपल्याला ऐकू येत नाहीत ते आवाज व घेता येत नाहीत ते वास श्वानांना सहज घेता येतात. त्याचा उपयोग करून घेण्याची क्षमता माणसांत असते. ती वापरून आपण पुढे होणाऱ्या घटना किंवा सभोवताली होत असलेल्या घडामोडी जाणून घेऊ शकतो. मासा पाण्यात झोपतो कसा याचे उत्तर जावे त्याच्या वंशा तेव्हाचि कळे असे आहे. पण मासे पाळणाऱ्यांना त्यांचे निरीक्षण करणाऱ्यांना झोपलेला आणि जागा मासा ओळखता येतो. मध्येच विशिष्ट लहरी घेणारे श्वान किंवा गीज पक्षी यांच्या भोवती वावरणाऱ्या माणसांनी त्यांच्या हालचालींवरून, आवाजांवरून ते जाणायचे असते. श्वानांना सभोवतालच्या घटनांची जाण होते व ते त्यांच्या भाषेत सावधानतेचा इशाराही देतात. त्या श्वानांशी जोडल्या गेलेल्या माणसांनी आपापल्या श्वानांच्या खास भाषाशैली समजावून घेऊन श्वान देत असलेल्या सूचना इतरांना सांगायच्या असतात. आपद्ग्रस्त सेवा विभागातील श्वान पालकांचे हे काम त्यांना करता यावे म्हणून श्वानाबरोबर त्यांची जी दोन नेहमीची माणसे (पहिला हँडलर व दुसरा हँडलर) असतात, त्यापैकी किमान एक माणूस २४ तास त्या श्वानावर नजर ठेवून असतो. श्वान काय सांगतो आहे ते वरिष्ठांना सांगणे हेच त्याचे खरे काम असते.

सर्व जीवांना झोपेची आवश्यकता असते, तशी ती श्वानांनाही असते. झोपेत प्रत्येक जीव आपल्या खर्च झालेल्या शक्तीची भरपाई करून घेत असतो. या काळात श्वानांना जी विश्रांती मिळते, त्यातूनच त्यांना ही शक्ती मिळते. म्हणून श्वानांच्या झोपेत व्यत्यय येऊ नये ही जबाबदारी दुसऱ्या हँडलरची असते. झोप चाळविणारी एखादी गोष्ट घडत असेल तर ती ताबडतोब दूर करणे, उकडत असेल तर पंखा चालू करणे, थंडी वाजत असेल तर पंखा बंद करणे, श्वानाला एकटे वाटत असेल तर सोबत करणे, आपल्या श्वानाला शांत झोपण्यासाठी किती प्रकाशाची आवश्यकता असते याचा अभ्यास करून व जेवण झाल्यानंतर श्वान किती वेळात झोपतो याचे निरीक्षण करून त्या वेळेला खिडक्या-दारे बंद करणे किंवा दिवा लावणे ही कामे दुसरा हँडलर सतत जागरुकतेने करत असतो.

अमेरिकेतील विद्यापीठाने प्रयोग करून श्वानांना स्फोटकांचा वास येत नाही असे सिध्द केले आहे. पण श्वान स्फोटके हुडकून काढतात हे सत्य कोणीही नाकारत नाही. कोसळलेल्या वास्तूच्या ढिगाऱ्याखाली जिवंत आणि मेलेला माणूस कोठे आहे हे आपद्ग्रस्तांच्या सेवेतील श्वान सांगतात. हे ते जिवंत माणसाचा श्वासोश्वास ऐकून व मेलेल्या माणसाच्या शरीराच्या वासाने सांगतात. भूकंपाचा दुसरा धक्का बसणार आहे, सुनामीच्या लाटा येत आहेत, पुराचे पाणी वाढते आहे या व अशा सूचना या सेवेतील श्वान देतात. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण द्यावे लागत नाही. फक्त या श्वानांना हाताळणाऱ्याने ते ऐकण्याचे व  वेळप्रसंग ओळखून त्याची माहिती इतरांना देण्याचे काम करायचे असते. श्वानांना त्यांचे त्यांचे काम करू देणे एवढेच या सेवेतील अधिकाऱ्यांचे काम असते.

इयत्ता बारावी उत्तीर्ण होऊन तुम्ही आपद्ग्रस्तांच्या सेवेत जाणार असाल, किंवा पदवी प्राप्त करून तुम्ही अधिकारी होणार असाल किंवा आवश्यक श्वानांचा पुरवठा करण्यासाठी दोन ते सहा किंवा आठ महिने श्वान वाढविण्याची राष्ट्रसेवा तुम्ही करणार असाल किंवा पुढे जाऊन योग्य श्वान पैदाशीकरिता श्वानपिढ्यांचे निरीक्षण करून योग्य श्वानांची संख्या वाढविणारी श्वानकुले तयार करणार असाल तर तुम्ही हे काम योग्य प्रकारे करणे आवश्यक आहे. सर्व सुजाण, बुध्दिवंतांनी एकत्र येऊन करायचे हे काम आहे. कोणीही एक व्यक्ती हे काम करू शकत नाही, कारण प्रत्येक पायरीवर वेगळे तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन हे काम करायला हवे व सहकारातून हे साध्य करायला हले.

आपद्ग्रस्त सेवा विभागातील श्वानांना माग काढायला शिकवीत नाहीत, पण युनिटमधील प्रत्येक व्यक्तीस तो व्यक्तिशः नावाने व वासाने ओळखतो. त्यामुळे प्रत्यक्ष काम करताना त्या युनिटमधील एखादा सहकारीच जर संकटात सापडला तर त्या युनिटचा श्वान त्याला नक्की शोधून काढून सुरक्षित ठिकाणी घेऊन जाईल. त्यासाठी निरोप पोहोचविणे हा धडा त्या श्वानांकडून नीट गिरवून घ्यायला हवा. त्यामुळे युनिटच्या माणसांचेही मनोबल उंचावेल व ते अधिक धैर्याने काम करतील.

वयाचे दोन ते आठ महिने या काळात श्वान आपल्या माणसांना शोधणे व त्यांच्या चीजवस्तू शोधून आणणे हे काम आवडीने करतात. याचा माझा अनुभव आजही माझ्या अंगावर रोमांच उभे करतो. प्रसंग अगदी साधा आहे. माझे आई-वडील व माझी मुले पाहुण्यांना घेऊन पुण्याच्या पद्मावतीच्या देवळात गेलो होतो. आमच्याबरोबर आमची डॉबरमन जातीची श्वान मादी आली. ती चार महिन्यांची होती. माझा छोटा मुलगा दिनेश याला कडेवर घेऊन माझे आईवडील झाडाखाली उभे राहिले. आम्ही इतर चार पाच जण देवदर्शन व प्रदक्षिणेला देवळाच्या कठड्याजवळ पादत्राणे काढून गेलो. आमच्या श्वानाला मी बाबांच्याबरोबर बस, आमच्याबचरोबर येऊ नकोस असे सांगितले होते. पण  तिला राहवेना. ती आमचा वासाने वेध घेत होती. ती एकदम उठली व देवळाच्या ओट्याखाली भक्तांनी काढून ठेवलेल्या ४०-५० पादत्राणांतून तिने आमच्या माणसांचे बूट,मोजे,चपला आणून आई बाबांच्या पायाजवळ ठेवल्या.

चपला उचलून आणायला मी आमचा आधीचा श्वान धनगरी जातीचा, वसंत याला शिकवले होते. त्यावेळी आम्ही अमरावतीला होतो. माझी मोठी मुलगी नीलिमा हिला तेथील उष्ण हवामानामुळे आम्ही पायात हवाई चपला घालून बाहेर जाण्याची सवय लावली होती. त्यामुळे बाहेर जायचे म्हटले की तिला चपला लागत. नीलिमा ५-६ पावलांच्या पुढे कधी चालली नाही, तिला ताबडतोब कडेवर घ्यावे लागे. तिला कडेवर घेतले की तिच्या  पायातील चप्पल कधी खाली पडे ते समजत नसे. आमच्याबरोबर आमचा श्वान वसंत किंवा वशाही फिरायला येई. चप्पल पडल्याचे लक्षात आल्यावर मी त्याला सांगे, अरे, आण ना, मग तो मुधोळकर पेठेच्या मैदानावरून किंवा आम्ही चालत आलो त्या सर्व रस्त्यांवरून फिरून नीलिमाची चप्पल किंवा माझा रुमाल शोधून आणत असे. पडलेली वस्तू शोधून आणण्याचे शिक्षण मी माझ्या श्वानांना देत असे. पण एकापेक्षा अधिक वास लक्षात ठेवून त्या वस्तू घेऊन येणे मी त्यांना कधी शिकविले नव्हते. आमच्या डॉबरमनने जेव्हा चपला बूट आणण्याचे काम आपणहून केले ते पाहून आम्ही अर्थातच त्याचे खूप कौतुक केले. प्रसंग पाहून काम करण्याची शक्ती आपद्ग्रस्त श्वानांत असणे जरुरीचे असते. सैनिकी शिस्तीत वागणारी शिपाई मंडळी असे शिक्षण देऊ शकत नाहीत.

शिस्त हा जेथील परवलीचा शब्द आहे, वरिष्ठांचे ऐकणे म्हणजेच शहाणपण हे जेथे अनुभवातून शिकविले जाते त्या शिक्षणपध्दतीत तयार झालेल्या माणसांकडून स्वतंत्र विचार करण्याची कुवत विकसित करण्याची अपेक्षा करणे हे चूकच ठरेल नाही का? श्वानांना त्यांच्या क्षमता वापरू द्याव्यात व जे श्वान स्वतःचे काम करण्याबाबत निर्णय घेतात, त्यांचे कौतुक करावे अशा आज्ञा श्वान हाताळणाऱ्या शिपायांना दिल्या जातील, तेव्हा त्या आज्ञांचे पालन होईल, पण श्वान पिले वाढविताना इतके स्वातंत्र्य शिपायांना देणे कोणत्याही सैनिकी यंत्रणेत शक्य नाही. म्हणून श्वानांच्या दोन ते आठ महिन्यांच्या संवेदनक्षम वयात ते सुबुध्द नागरिकांच्या कुटुंबातच असायला हवेत. सुजाण नागरिक ही जबाबदारी देशसेवा म्हणून स्वीकारतील तो सुवर्णकाळ ठरेल.

अहमदाबाद येथील एका अकरा मजली इमारतीत राहणाऱ्या वयस्क स्त्रीला त्यांच्या श्वानाने कसे वाचविले हे लक्षात घेण्यासारखे आहे. सौ शहांचे श्वान ती फिरण्याची वेळ नसतानाही त्यांना घराबाहेर घेऊन गेले. सौ शहा व श्वान फिरायला गेले आणि ती अकरा मजली इमारत कोसळली. हा केवळ योगायोग नाही. त्या श्वानांना त्या अपघाताची आगाऊ सूचना आवाजाने अशीच मिळाली असेल. त्या श्वानाचे सांगणे ऐकले म्हणून सौ शहा यांचा जीव वाचला.

त्याचप्रमाणे श्वानांचे सांगणे न ऐकल्याने जीव गेल्याची घटना माझे मित्र तेंडुलकर यांनी मला सांगितली. कुटुंबाचे प्रमुख श्री रामराव देशमुख त्यांच्या जवळच्या मित्राच्याकडील लग्नाला निघाले होते. ते बाहेर निघाले तसा त्यांचा अल्सेशियन कुत्रा त्यांचे पाऊल बाहेर पडू देत नव्हता.

(मधला मजकूर नाही)

आपद्ग्रस्त परिस्थितीत एखाद्या ढिगाऱ्याखाली माणूस असेल तर ते सांगण्याच्या श्वानांच्या सहा सात वेगवेगळ्या पध्दती असतात. काही श्वान ढिगाऱ्याखाली कोंडल्या गेलेल्या माणसाला बाहेर काढण्यासाठी ढिगारा उकरून काढायला सुरुवात करतात. ते श्वान बंद दारावर किंवा चिरा गेलेल्या भिंतींवरही असाच पंजा मारतात. काही श्वान माणूस सापडला की शेपूट हलवू लागतात. काही श्वानांचे खांदे ताठ होतात. पाठीवरचे व मानेवरचे त्यांचे केस उभे राहतात. काही श्वान हँडलरच्या डोळ्यात पाहून नजरेने सांगतात, तर काही श्वान मागचे पाय दुमडून खाली बसतात. काही श्वान पुतळ्यासारखे स्तब्ध होतात व पुढचा एका पाय दुमडून घेतात. ढिगाऱ्याखाली माणून सापडला की बहुतेक श्वानांचे लक्ष एकदम केंद्रित होऊन त्यांच्या हालचालीत व वेगात फरक पडतो. काही श्वान जास्त हालचाल करू लागतात, तर काही श्वान थरथरू लागतात. काही श्वान वर सांगितल्याप्रमाणे पुतळ्यासारखे स्तब्ध होतात. काही श्वानांच्या तोंडातून हलकासा भुंकण्याचा आवाज निघतो. अशा श्वानांना हलकेसे प्रोत्साहन दिले तर हे श्वान मोठ्याने भुंकून मला सापडला, मला सापडला असे सांगत सुटतात.

प्रत्येक श्वानाला त्याच्या मूळ स्वभावाप्रमाणे वागू दिले तर काम शिकण्याचा ताण त्या श्वानावर न पडता काम करण्याचा त्याचा  आनंद वाढत जातो व तो जास्त कार्यनिपुण होतो. टेकनपूर येथे श्वान-प्रशिक्षण केंद्र आहे. तेथे गस्त घालणारे, माग काढणारे, स्फोटके दाखविणारे, रखवाली करणारे, आपद्ग्रस्त सेवा देणारे असे अनेक निमसैनिकी सेवांना लागणारे श्वान घडविले जातात. त्यासाठी विविध जातींच्या पैदासकारांची त्यांच्याकडे नोंद असते. पिले जातीबरहुकूम आहेत ना व त्यांची वजने वयाबरहुकून वाढलेली आहेत ना, हे तेथे बघितले जाते. पिलावळीच्या आईवडिलांची नोंद पैदासकारांनी आधीच पाठविलेली असते. प्रत्येक पिलाचा ओळख क्रमांक त्याच्या पाठीवर घातलेला असतो. यंत्राने त्याची पाहणी केली जाते व पिले नेली जातात. टेकनपूरला अनुभवी जेसीओच्या देखरेखीखाली ती पिले वाढविली जातात. तेव्हाच त्यांची वर्गवारी होऊन त्यांचे विभाग ठरतात. पण सैन्यतळांवर शिस्तीत वाढलेल्या त्या श्वान पिलांचे माणसांच्या विचाराप्रमाणे शरीर रसायनात होणाऱ्या बदलांचे अनुभव कमी पडतात.

लष्कराच्या शोधक श्वान पथकाचे श्री राव यांनी पुण्याच्या १४५ बटालियनला भेट दिली त्यावेळी कमांडर श्री जसबीरसिंग संधू यांनी आपद्ग्रस्त सेवेतील केंद्रीय पोलीस संघटनेची माहिती दिली. श्री राव यांनी श्वान पथकासंबंधी विचारले. श्री संधूंनी माहिती दिली की ४५ माणसांच्या युनिटबरोबर दोन श्वान पुरविण्याची आमची योजना आहे. पहिले

चार श्वान टेकनपूरच्या संख्येतून आलेले आहेत. लॅबराडोर जातीच्या या चार श्वानांना टेकनपूर येथे सुरुवातीचे कवायती शिक्षण दिले गेले होते. श्वानांची भाषा हँडलरने शिकली पाहिजे व त्यात बदल करण्याच्या भानगडीत न पडता आपला श्वान ज्या पध्दतीने ढिगाऱ्याखाली पडलेला माणूस दाखवितो त्याचे कौतुक करून तीच पध्दत त्याला वापरावयाला प्रवृत्त करावे असा त्यांचा आग्रह होता.

कमांडर संधू साहेबांशी गप्पा मारताना श्वानांना काय काय शिकविले जाते ते मी त्यांना सांगत होतो. त्यात आल्पस् पर्वतावरचे सेंट बर्नार्ड जातीचे श्वान गळ्यात दारूची बाटली व ब्लँकेट बांधून खिंडीतील रस्त्यावरून जात असतात. त्यांना कोणी वाटसरू बर्फात अडकलेला आढळला तर त्याच्या जवळ जाऊन ते त्या आपद्ग्रस्ताला त्यांच्या गळ्यातील सामान कसे काढून देतात, ते मी समजावून सांगितले. अशा परिस्थितीत आपल्याकडे तो आपद्ग्रस्ताला पाणी किंवा चहा कसा नेऊन देऊ शकेल ते मी त्यांना सांगितले. तशी मदत करणे आपल्या श्वानांना शिकवावे असे त्यांनी मला गांगितले. ते मी लगेच आनंदाने मान्य केले. पाण्याची बाटली वा चहाचा थर्मास लॅबराडोर जातीच्या श्वानाच्या पाठीवर बांधणे शक्य नव्हते. त्यासाठी त्या श्वानांच्या स्लेज पट्ट्यांना पाठीवर झुलीसारख्या पिशव्या बांधून त्यात दोन्ही बाजूला बाटल्या, थर्मास वगैरे ठेवण्याची सोय करवून घेतली. या पिशव्या पाठीवर घेऊन हिंडण्या-फिरण्याची , उड्या मारण्याची, क्रॉसिंग करण्याची, पाइपमधून जाण्याची सवय करण्यास सुरुवात केली. आधी नुसती झूल व नंतर त्यात रिकाम्या बाटल्या व शेवटी भरलेल्या बाटल्या देऊन हे सर्व करायला चार पाच आठवडे लागले.

या कवायतीत सैन्यात निरोप पोहोचविण्याचे शिक्षण देतात. तसेच लपविलेला माणूस शोधून त्याच्या जवळ जाऊन पोझीशनमध्ये पडण्याचे शिक्षण देण्याचा धडा गिरविण्यास सुरुवात केली. त्यासाठी पहिला हँडलर व दुसरा हँडलर यांच्यामध्ये ३०फूट अंतर ठेवून पहिल्या हँडलरने गो म्हणून सांगायचे व दुसऱ्या हँडलरने कम म्हणून बोलवायचे ही शिकविण्याची पहिली पायरी दिली. चारांपैकी तीन श्वान जरा आळशी होते. एक श्वान काम करीत होता. त्याने चांगले काम केले, आम्ही सांगतो त्याप्रमाणे केले की आम्ही त्याला टिटबिट म्हणजे त्याला आवडणारा खाऊ देत होतो. हा खाऊ पेढा, मांसाचा वास येणारी गोळी असे काहीही असू शकते. काम करणाऱ्या श्वानाला चांगल्या कामाबद्दल बक्षीस दिले जाते हे बाकीच्या तीन श्वानांनी पाहिले. मग बाकीच्या तीन श्वानांना ओळीत उभे करून त्यांच्या समोर पहिल्या श्वानाकडून काम करून घ्यायचे व त्याला शाबासकी म्हणून खाऊ द्यायचा असे करू लागलो. बाकीच्या तीन श्वानांसमोर त्याला गो असे सांगून त्याच्याकडून हवे ते काम करून घ्यायला सुरुवात केली. पहिला श्वान हँडलरजवळ पोहोचला व दुसऱ्या हँडलरजवळ डाऊन झाला की सर्वांनी टाळ्या वाजवून गुड बॉय म्हणून त्याचे खूप कौतुक करायचे हे आधीच ठरवून दिले होते. असे कौतुक आपलेही व्हावे म्हणून इतरही श्वान काम करायला प्रवृत्त होतील हा त्यामागचा हेतू होता. सुरुवातीचे ३० फुटाचे अंतर ३० मीटरवर नेऊन दोन्ही हँडलर दिसत असताना श्वानांना शिकविले. सकाळ, संध्याकाळ हा सराव तीन चार दिवस केल्यावर दुसरा हँडलर श्वानाला दिसणार नाही, पण त्याचा आवाज ऐक येईल अशा प्रकारे इमारतीच्या कोपऱ्याआड त्याचवेळी पहिला हँडलर व श्वान अशी योजना केली. यावेळी दोहोंतील अंतर पुन्हा ३०-४० फुटांवर आणले होते. पहिल्या हँडलरने गो असे सांगितलेले ऐकू येताच दुसऱ्या हँडलरने कम म्हणून साद घालून श्वानांना बोलवायचे  हा धडा देत असतानाही इतर श्वान व हाताळणारे दोघांनाही पाहू शकतील असे उभे केले होते. दुसऱ्या आठवड्यात दुसऱ्या हँडलरऐवजी  श्वान ओळखतो अशा दुसऱ्या माणसाला उभे केले. त्या माणसाने आवश्यकता पडली तरच साद घालायची, एरवी श्वान जवळ आला की त्याला शाबासकी द्यायची असे करता करता सरळ रेषेत माणूस दिसत असताना अगदी त्रयस्थ माणसाजवळ जाऊन श्वान डाऊन करू लागले .हे करायला        आठवडे लागले.

याच्या आधीच श्वानांना खुणावलेल्या दिशेने पुढे जाण्याचे धडे द्यायला सुरुवात केलेली होती. त्यासाठी मेंढपाळ श्वानांना शिकवितात तसे राइटले (उजवीकडे वळ), लेफ्टले (डावीकडे वळ) हे हुकून आधी गिरविले. हे हुकूम देताना राइट टर्न असे न म्हणता टर्न रा इ ट असे उच्चारायला लावले. टर्न उच्चारताना श्वानाचा वेग कमी करत र इ ट म्हणताच ते उजव्या बाजूला वळू लागले. हे गिरविण्यासाठी दिलवर्कचाच आधार घेतला. आधी साखळीवर व नंतर साखळी सोडून राइट टर्न आधी करून घेतला, कारण राइट टर्न घेतल्यावर श्वानाला वळायला वेळ लागला तरी त्याला आठवणीने इशारा करता येतो. राइटनंतर लेफ्ट व शेवटी अबाउट टर्न आणि तेज चल हे चार हुकूम पक्के व्हायला आठवडे लागले. त्याच वेळी इन हा महत्वाचा नवा शब्द आम्ही त्यांना शिकविला. इन म्हणजे आत शिकविण्यासाठी आम्ही फुटबॉल ग्राउंडचा वापर केला. श्वानाला स्वतःला दिसेल अशा ठिकाणी त्याची खाण्याची बशी व त्यात थोडा खाऊ ठेवला. त्याभोवती प्रदक्षिणेच्या विरुध्द दिशेने हँडलर श्वानाला घेऊन फेरी मारू लागला. श्वानाचे लक्ष खाण्याकडे आहे एवढ्याच वेळात इन सांगून श्वानाला पुढे धावत जाऊन खायला हँडलरने उद्युक्त केले. सुरुवातीला प्रदक्षिणेच्या विरुध्द दिशेने श्वानाला नेण्याचे कारण म्हणजे हँडरच्या डाव्या बाजूने दिलवर चालणारा श्वान इन सांगताच सरळ खाऊकडे जाऊ शकत होता. त्यानंतर श्वानाला प्रदक्षिणेच्या दिशेने फिरविले. श्वान व खाऊ यांच्यामध्ये हँडलर चालत असल्याने श्वान हँडलरच्या पायांना धडकण्याचा संभव होता. तसे होऊ नये याची योग्य ती खबरदारी हँडलर घेत होते. खाऊ व श्वान यातील अंतर श्वानाचा वेग कमी होणार नाही अशा बेताने वाढवत गेलो. यावेळेपर्यंत राइट व लेफ्ट हे हुकूम काढून टाकून त्याऐवजी खुणा श्वानांना शिकविल्या. इमारतीच्या पलीकडे दुसऱ्या हँडलरला उभे करून पहिला हँडलर त्यांच्या श्वानाला इमारतीच्या राइट किंवा लेफ्ट टर्न सांगून इमारतीच्या डाव्या किंवा उजव्या बाजूने दुसऱ्या हँडलरकडे पाठवू लागला. गो असे सांगितले की सरळ रेषेत पुढे जायचे, कम असे सांगितले की हँडलरकडे यायचे, राइट किंवा लेफ्ट असे सांगितले की त्या दिशेला वळायचे हे श्वान आठवड्यात करू लागले. आपद्ग्रस्त माणूस दाखविला व गो असे सांगितले की स्वतःहून डावी, उजवी दिशा बदलून, अडथळे ओलांडून त्या माणसाजवळ जात श्वान डाऊन होऊन त्यांना पाठीवरच्या बाटल्या वा थरमॉस काढून देऊ लागले. आवश्यक तेथे हँडलर त्यांना दिशा बदलायला सांगू शकत होते, पण अवघड जागी पोहोचणे, पाईपमधून रांगत वा सरपटत जाणे, आपल्या पाठीवरचे पदार्थ अकून पडलेल्या माणसापर्यंत पोहोचविणे हे शिकायला श्वानांना आठवडे लागले.

या काळात विषय समजावण्यासाठी तासिका लेक्चर दिले. तर श्वानांना शिकविण्यास व सराव करण्यास प्रात्यक्षिकाच्या तासिका लागल्या. या काळात दोन माणसांनी श्वान न घेता प्रात्यक्षिक पाहायचे व त्या काळात दोन हँडलरांनी श्वानांचा सराव करून घ्यायचा असा परिपाठ ठेवला होता. दोघा निरीक्षकांनंतर प्रत्यक्ष सराव करताना दररोजचे दोघेजण बदलले जात. आज ए बी व सी डी असत, तर दुसऱ्या दिवशी ए सी व बी डी अशा जोड्या केल्या जात.

माणूस प्रत्यक्ष काम करताना जे शिकतो, त्यापेक्षा तो दुसऱ्यांना काम करताना पाहण्यातून अधिक चांगले शिकतो हा माझा अनुभव आहे. स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही, पण दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते. म्हणजेच स्वतःच्या चुका स्वतःच्या लक्षात येत नाहीत, पण दुसऱ्यांच्या चुकांपासून पुढच्यास ठेच, मागचा शहाणा या म्हणीप्रमाणे माणसे लवकर शिकतात. माणसेच नाही, तर श्वान देखील दुसऱ्यांना काम करताना पाहून चांगले शिकतात, हा माझा अनुभव मी या ठिकाणी वापरला. त्यासाठी चार श्वान मला येथे मिळाले हे माझे भाग्य!

आपद्‌ग्रस्तांना सोडविण्याचे प्रात्यक्षिक देणे हा या मंडळींचा नेहमीचा उद्योग असतो. अशा प्रात्यक्षिकामध्ये श्वान सेना प्रत्यक्ष भाग घेण्याची क्रिया २००८पासून होऊ लागली. माणसाच्या सफाईदार कामापेक्षाही श्वान सेनेचे सह्रदय काम कांकणभर अधिकच वाहवा घेऊन जाते. हे प्रत्यक्ष अनुभवणे हा एक आगळाच अनुभव आहे.